# प्रस्तावना

आधुनिक महाराष्ट्राच्या जडणघडणीमध्ये कै.यशवंतराव चव्हाण, कै.वसंतराव दादा पाटील, कै.बाळासाहेब देसाई, यांच्या बरोबरीनेच कै.राजारामबापू पाटील यांचा वाटा मोलाचा आहे. ही चार पश्चिम महाराष्ट्रातील नेते मंडळी म्हणजे आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार होते असे म्हटले तर ते चुकीचे ठरणार नाही. ग्रामीण भागातील या नेत्यांनी मुंबई व महाराष्ट्र राज्यांच्या मंत्रीपदाची सत्ता हाती आल्यावर ती सत्ता वापरुन ग्रामीण महाराष्ट्रांचा चेहरामोहराच बदललेला आहे. वरील नेते मंडळीच्या जीवन कार्याचा सविस्तर अभ्यास संशोधकांनी केला आहे. परंतु राजारामबापू पाटील हे एक दुर्लक्षित असे व्यक्तिमत्व राहिल्यामुळे मी या शोध प्रबन्धात त्यांच्या जीवन कार्याचा अभ्यास केलेला आहे.

सांगली जिल्हामध्ये बहुजन समाजाचे नेते म्हणून राजारामबापू पाटील यांचे नेतृत्व सन १९२० च्या दरम्यान उदयास आले. शैक्षणिक,सामाजिक,आद्योगिक व धार्मिक क्रांती कोल्हापूरच्या ज्या राजर्षि शाहू महाराजांनी घडवली,त्या राजर्षि शाहूच्या विचाराने भारलेल्या कोल्हापूरमध्ये घडवलेले एक विचारनिष्ट व्यक्तिमत्व म्हणजे राजारामबापू पाटील होय. छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा जोतिबा फूले,छत्रपती शाहू महाराज यांचे आदर्श व त्यांच्या कार्यापासून प्रेरणा घेऊन राजारामबापू पाटील यांनी सांगली जिल्हामध्ये सामाजिक कार्याचे तोरण बांधले.

राजारामबापू पाटील ग्रामीण भागातून आले होते.त्यांच्या कर्तबगारीमुळे बहुजन समाजाचे नेते म्हणून त्यांचा उदय झाला आणि ते महाराष्ट्राचे विविध खात्यांचे मंत्री झाले.

राजारामबापू पाटील यांचा राजकारणात मोठा प्रभाव होता,त्यांनी आपल्याकडे असणाऱ्या राजकारणातील प्रभावाचा उपयोग गोरगरीब व सर्वसामान्यांची सेवा करण्यासाठी केला व आपले आयुष्य गरीबांच्या,शेतकऱ्यांच्या

व कष्टक-यांच्या उन्नतीसाठी व्यतीत केले. संपूर्ण महाराष्ट्रातील लोकांना उपयोगी अशी खातेपुस्तिका,३००- लोकसंख्या असणाऱ्या वाड्यांना गावाचा दर्जा,कमीतकमी दरामध्ये सर्वसामान्य लोकांच्यापर्यन्त वीज,व उद्योगधंदास प्रोत्साहन,तसेच वाळवा सहकारी साखर कारखाना,वाळवा दूध संघ, वाळवा बॅन्क, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर इत्यादि प्रमुख व भरीव कामांची उभारणी राजारामबापूंच्यामुळे झाली आहे हे कार्य महाराष्ट्र कधीही विसरु शकत नाही.

त्यांच्या या प्रचंड कार्यामुळे व बहुजन समाजाची उन्नती होण्यासाठी त्यांनी केलेल्या धडपडीमुळे महाराष्ट्रातील जनता त्यांना ` लोकनेता ` म्हणून ओळखते.

अशा या लोकनेत्याची व त्यांच्या प्रचंड कार्याची ओळख व्हावी व त्यांच्या शैक्षणिक ऋणातून थोड्या फार प्रमाणात उतराई होण्यासाठी राजारामबापूंच्या जीवन कार्याचा आढावा घेण्याचा या ठिकाणी मी प्रयत्न केलेला आहे. महाराष्ट्र राज्याच्या मुंबई येथील विधानभवनाच्या ग्रंथालयामधील मुंबई व महाराष्ट्र राज्य विधानसभेची डिबेटस इत्यादि अस्सल कागदपत्रांच्या आधारे त्यांच्या कार्यावर प्रकाश टाकणेचा प्रयत्न केला आहे. प्रकाशित दुय्यम साधने, स्मरणिका यांचा आवश्यक ठिकाणी उपयोग केला आहे.राजारामबापूंच्या समकालीन लोकांच्या मुलाखती घेऊन सत्यता पाहण्याचा प्रयत्न केला आहे.त्यांच्या कर्तबगारी विषयीची माहिती मिळविण्यासाठी काही वृत्तपत्रे बारकाईने पाहून त्या माहितीचा योग्य ठिकाणी उपयोग करुन हा शोध प्रबन्ध पूर्ण केला आहे.

या संशोधन कार्यात अनेक लोकांचे सहकार्य व प्रोत्साहन मिळाले म्हणून त्यांचे आभार मानने मी माझे कर्तव्य समजतो. सुरुवातीस या संशोधन प्रबंधाच्या कार्यात मला वेळोवेळी माझे मार्गदर्शक डॉ.बी.टी.खणे, यांचे मार्गदर्शन मिळाले म्हणून मी हे काम वेळेत पूर्ण करु शकलो म्हणून मी त्यांचा अत्यंत आभारी आहे.

मा.राजारामबापू पाटील यांच्या शैक्षणिक,सामाजिक व सहकारी कार्याचा वारसा तितक्याच तडफेने पुढे चालविणारे त्यांचे सुपुत्र मा.आमदार

श्रीयुत जयंतराव पाटील आणि त्यांच्या नेतृत्वाखाली सुरु असणाऱ्या संस्थाचे सहकारी यांनी मला वेळोवेळी सहकार्य मिळाले याबद्दल मी त्यांचा आभारी आहे.

वाळवा पंचायत समितीचे सभापती मा.जर्नादन पाटील तसेच कासेगांव शिक्षण संस्थेचे सचिव मा.पां.वि.जगताप,तसेच राजारामबापू सहकारी बॅन्केचे जनरल मॅनेजर श्री जाखले यांनी मला वेळोवेळी योग्य माहिती मिळवून देण्यासाठी फार मोठी मदत केली त्या सर्वांचा मी आभारी आहे.

तसेच या संशोधन कार्यात आर्टस,कॉमर्स कॉलेज ,कासेगाव येथील प्राचार्य मा.शरद भोसले व आष्टा येथील आर्टस अॅण्ड कॉमर्स कॉलेजचे माजी प्राचार्य मा.वसंतराव माने यांच्या सहकार्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे.

तसेच मुंबई विधान भवन ग्रंथालयातील अधिक्षक श्री डिसोझा व ग्रंथालयातील सहाय्यक अधिक्षक-ग्रंथपाल श्री वाघमारे एस.जी. तसेच आमच्या आर्टस कॉमर्स अॅण्ड सायन्स कॉलेजमधील ग्रंथपाल कु.परब व आर्टस अॅण्ड कॉमर्स कॉलेज, आष्टा येथील ग्रंथपाल श्री पाटील यांच्या सहकार्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे.

संशोधनाच्या कामामध्ये मला दै.अग्रदूत चे संपादक श्री बापूसाहेब जाधव, दै.पुढारी चे संपादक श्री प्रतापसिंह जाधव, दै.समाज कोल्हापूरचे संपादक श्री बापूसाहेब कापसे, दै.सकाळ (कोल्हापूर ) संपादक अनंत दिक्षित ,दै.तरुण - भारत कार्यालय ,कोल्हापूर येथील ऑफिस इनचार्ज श्री देशपांडे इत्यादिंच्या सहकार्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे.

तसेच माझी आई व वडिल श्री देवाप्पा थळू घोलप यांच्या आर्शिवादाने व माझी पत्नी सौ.वर्षा हीच्या सहकार्याने मी हे काम वेळेत पूर्ण करु शकलो.

हे काम करीत असताना आमच्या मादोळे गावचे डॉक्टर श्री संपत पाटील व कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती बॅन्क शाखा सावर्डे चे मॅनेजर श्री आनंदराव पाटील यांचे मला प्रोत्साहन मिळाले म्हणून मी त्यांचा आभारी आहे.

हस्तलिखिताच्या कामामध्ये कासेगांवमधील श्री अंकुश पाटील,(जगताप), श्री शांताराम माळी,श्री.शंकर गावडे व सचीन पाटील यांनी मला मदत केली त्यांचा मी आभारी आहे.

टंकलेखनाचे काम वेळेत पूर्ण करुन दिल्याबद्दल मी श्री बाळकृष्ण रामचंद्र सावंत,कोल्हापूर यांचा मी आभारी आहे.

इस्लामपूर — श्री घोलप एस.डी.

दिनांक : : :१९९४।